मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
(जिल्हा वाचनालय)

मासिकाचे नांव — उषा

संपादक —

मासिक क्रमांक — सन — १९१४, १९१५

अंक — ७.८.९.१०.११.१२ = १९१४

(महिने) २.३.४.५.६ = १९१५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. जुनी मासिके (संदर्भ)

अंक २४ वर्ष २ रें जून १९१५.

Reg. No. 1106 Bom.

# उषा



स. भा. ८९१२

# श्री. बाळासाहेब मिरजकर.



—यंदाच्या साहित्यसंमेलनाचें अध्यक्षस्थान श्री. बाळासाहेब मिरजकर ह्यांनी अलंकृत केलें होतें.

# गोड गोड खोल खोल.

[ कवि—श्री. दे. भा. लेले. बी. ए. ] पद–कलिंगडा–एकताल.

गोड गोड खोल खोल ।
थांब मना ऐकूं दे बोल ।
रोज रोज तोच तोच ।
पुरे जगा ( जरा ) तव हलकल्लोळ ॥ धृ० ॥
नकळे हसणें नकळे रडणें ।
नकळे गाणें कीं विवळणें ।
हसत रडवी खळखळ ॥ गोड० ॥ १ ॥
नकळे जुना ओळखीचा ।
कीं हा नवाचि आतांचा ।
भासत म्हातारा बाळ ॥ २ ॥
शहाण्यासी वेडें करी ।
वेडीयासी धरी शिरीं ।
शहाणा वेडा कीं सवाल ॥ ३ ॥
प्रतिष्ठेची चेष्टा करी ।
साळ्याभोळ्या देई थोरी ।
भोळा हा म्हणुं कीं टवाळ ॥ ४ ॥
सकळा नादांसी लोपवी ।
परि काना ऐकु न येई ।
म्हणावा उंचकीं हा खोल ॥ ५ ॥
ज्ञाणों धरुनी थांबवीतो ।
परी नाचु उडवितो ।
काय हा स्थिर कीं चंचल ॥ ६ ॥
मनाच्छिद्र छिद्रीं भरतो ।
मना शुन्यचि करितो ।
भरीव तितुका पोकळ ॥ ७ ॥
मनोमंदिराचीं सारीं ।
गूढ तळघरें भरी ।
घुमवी हलवी हा डोल ॥ ८ ॥
गोडी सुधेची भासवी ।
निस्यान्नीं विष कालवी ।
मारूनि जीववी सखोल ॥ ९ ॥
ही का मागीलाची स्मृती ।
कीं ही पुढली आशाततो ।
दोहींचा मेरुमणि गोल ? ॥ १० ॥
जवळिचे हा दुरावी ।
दूरदेशीं बंधू दावी ।
नात्याचि करि भेसळ ॥ ११ ॥
दिव्य चित्रें प्रकटवी ।
नव्यभव्यपणें भिववी ।
नाटक दिव्यकीं गोंधळ ॥ १२ ॥
माझे अंतरीं जरि घुमतो ।
माझा नच म्हणवे तो ।
भरीला यानें विश्वगोल ॥ १३ ॥
ऐकूं जातां स्तब्ध होतो ।
शांत होतां ताना घेतो ।
चटकाचि लावी केवळ ॥ १४ ॥
तिखट काना नाकळे तो ।
बधिरालाची ऐकूं येतो ।
ऐसा हा अद्भुत बोल ॥ १५ ॥
ऐसा बोल आयकिला ।
स्वयें बोलाचि जाहला ।
तयासि ब्रम्हानंदिं डोल ॥ १६ ॥

# वसंतकालीन बालभानु.

( कवि—आनंदराव कृष्णाजी टेकाडे, नागपूर. )

[ अहा सरोवर किती मनोहर०—या चालीवर. ]

उदयगिरीवर कुणीं उडविला चेंडु सुवर्णाचा
परत न जातां खालीं, कैसा अलग राहि साचा।
का लटकविला सुंदर गोलक व्योम—छता कोणी
गगनश्री का दिव्य कुंडला खोवी निज श्रवणीं।
सुवर्ण रंगित सु-पक्व फळ कीं काय गळुनि पडलें
त्या झेलाया उदयगिरीनें हात वरी केले।
भालीं धरि कीं तिलक मनोहर हा प्रकृती देवी
सौभाग्याविण ललना—जीवन नीरस हें सुचवी।
प्रमोद चित्ता होतां उठती हास्य-लहरि गालीं
एकवटोनी चराचरां ही तीच दिसे लाली।
अदृश्य आत्मा जो ब्रह्मांडा चैतन्या देई
दृश्य दिव्य ह्या रूपें पुढतीं काय उभा राही!॥ १॥

* * *

शांत स्थलि कीं प्रशांत शीतल नील सलिल बघुनी
प्रसन्न झाला धनी जगाचा निज अंतःकरणीं।
कारंजें हें ह्मणुनि लाविलें रुचिर इथें सान
अग्रभागीं हें चक्र स्वर्णमय त्यावरि असमान।
कारंजाचे तुषार कोमल पडती गिरिशिखरीं
बंधुबंधुचें मीलन होतां उठति हर्ष-लहरी।
प्रेमें हृदया हृदय भेटतां प्रेमाश्रू स्रवती
त्याच अश्रुंना कुणी संभ्रमें 'सरिता' हें वदती।

उदार सज्जन जगीं उपकारा कधिंही नच विसरी
त्या कारंजा तदीय जीवन शैल मुदें वितरी ।
मंद मंदशा शीत तरंगें मारुत जो विचरी
शीतलता ती चोरुनि आणी तेथूनिच सारी ॥ २ ॥

* * *

कीं जैं केलें सागर-मंथन सुर दानव मिळुनी
तदां चतुर्दश सुंदर रत्नें निघति तयामधुनी ।
रत्नासाठीं युद्ध तयांचें होई जें उभयीं
अवलोकुनि तें विषाद वाटे सागरास हृदयीं ।
रत्न अमोलिक म्हणुनि एक जें लपवुनि ठेवि तसें
तेंच आजच्या शुभ दिनिं काढुनि विश्वा लावि पिसें ।
कुणास द्यावें ह्या रत्नाला विचार करि तवमनीं
असुर बुभुक्षित सुरही तैसे दिसे न पात्र कुणी ।
सत्कविच्या मृदु हृदय-कोंदणीं निज रत्ना बसवी
निरिच्छ प्रेमळ तथा आढळे जगतीं एक कवि ।
प्रत्येकाच्या काव्यामाजीं विलसे हें रत्न
म्हणुनी शोभा तदीय कवनां, सफल होति यत्न ॥ ३ ॥

* * *

सहस्रदलयुत क्षितिजीं उगवे रक्त कमल कीं हें
दिङ्मंडाळीं जो सुगंध भरला, तेंच विखरिताहे ।
अफाट सगळ्या सरोवरीं ह्या एकचि कमल कसें
परि गुंजारव करित रसिकवर मधुप कुठें न दिसे ।
काय न दिसलें सारस फुललें तयास हें अजुनी
शक्य न हें परि अत्तांच कीं तो निघे तयामधुनी ।
" कमलांतिल ह्या मधु प्राशितां शुष्क होय अंतीं
होइल केंवी जनमनरंजन त्याकरवीं पुढतीं " ।
विचार ऐसा करुनी गेला स्वस्थानीं भृंग
उदारतेच्या नित्य कल्पनीं थोर जीव दंग ।

रम्य वस्तु कधिं भोक्त्याविण कां निर्मिल प्रभु भुवनीं
ह्मणुनी हस्तें तया खेळवी कवि अपुल्या कवनीं ॥ ४ ॥

* * *

अदयपणें तो ग्रीष्म पोळवी कृश करि सकल मही
नाजुक ऐशा वसुंधरेला तिमिर ताप देई ।
सत्याला पळवाया लावी तांडव अनृत करी
क्षमा दयेची होळी करुनी भीषणता पसरी ।
अज्ञानाचें राज्य पसरुनी मूढ करुनि सोडी
आत्मत्त्वा विसरवुनी जगता, विषयिं लावि गोडी ।
अशा राक्षसा संहरण्या कीं इच्छुनि वनमाळी
उदयगिरीच्या समईवरि हा रत्नदीप उजळी ।
मोह—पटल दुरि उडे निमिषिं तम पाताळीं दडला
चोंहिकडे हा सत्तत्वाचा प्रकाश कीं पडला ।
अज्ञानाच्या गर्तेमार्जी जग बुडलें होतें
निज प्रभावें वरि काढी तो, लावि योग्य पंथें ।
सत्या धरुनी, ईशा स्मरुनि निज कर्त्तव्याला
लागिं जगा संदेश सुचवि हा करि स्वोद्धाराला ॥ ५ ॥

* * *

मग ही धडपड कशास चाले स्थिरचर सृष्टीची
कुणी कुणाचें ऐकत नाहीं, गोष्ट कौतुकाची ।
अति त्वरेनें चंद्र पळतसे प्राचि दिशे हा कां
कुणास भारद्वाज मारितो मंजु रवें हांका ।
प्रेमें कवणा बघति तृणांकुर सहस्र नयनांनीं
कुणास भिउनी नयन झांकिले नभिंच्या तार्‍यांनीं ।
तेज स्फुटता दीप ज्योतिची अस्फुट कां झाली
विमणीं बाळें चिंव चिंव करिती चिमण्या घरकुलीं ।
कवणाच्या स्वागतास करि हा द्विजवर चंडोल
कुणा पाहुनी डुले प्रमोदें आखिल विश्व गोल ।

वेदमंत्रजयघोष द्विजांचा कोणास्तव चाले
तद्रमणींच्या मंगल गीतीं कोण दिसे भरलें ।
सुगंध अर्पिति कुणा सन्मनें पुष्पराजि अपुला
कुणास लाजुनि पदर मुखीं घे ही रजनीबाला ।
ईश-मंदिरीं घंटा-रव जय बोले कवणाचा
कुणास हळुं हळुं वारा घाली पर्णवृन्द तरुचा ।
विकसित झाल्या कलिका परिसुनि कवणाची वार्त्ता
कुणा देखुनी मुदें बिलगती लतिका प्रिय नाथा ।
त्यजुनि मलिनता होति शुचिर्भुत किमर्थ घनपंक्ति
बंदिवान 'जय'कार गर्जुनी कवणा पथ देती ।
मुग्ध कमलिनी वेड्यासम ह्या हांसत कां सुटल्या
करांत कर टाकुनी कुणाच्या नाचत कीं बसल्या ।
दृष्टि काढिती आम्र-मंजिऱ्या हर्षें कवणाची
शाल कुणावरि झळकत आहे दिव्य वसंताची ।
हळु स्पर्शुनी मृदुल करें निज उठवी कोण मुलां
स्वागमनानें कोण दुभंगी प्रेमी हृदयाला ।
प्रतिबिंबित ही झाली अवनी कुण्या दिव्य रूपें
द्वेष, मोह, मद स्वार्थादिक हीं जळती कीं पापें ।
चित्‌शक्तीचे पाट वहाति हे कुण्या घटामधुनी
पान करी मनसोक्त विश्व हें सुखें तटीं बसुनी ।
प्रसन्नतेचें गीत भावमय सगळ्या महिवरते
अणुरेणूमधिं घुमे, ऐकुं ये कारण ना कळतें ।
काय हरपलें कुणा संभ्रमें शोधिति द्विज सु-मनें
कुणास बघुनी लिही रुचिर नव कवि अपुलें गाणें ॥ ६ ॥

* * *

हीच हीच कां वस्तु सकाळिकां अनामिका दिसली
म्हणुनी ऐशी चंचलता का तद्-हार्दें संचरली ।
छे ! छे ! भ्रम हा सोडा सोडा सत्य हृदयिं आणा

उषादेविचा कुमार सुंदर हा गोजिरवाणा ।
तज्जन्माच्या आनंदाचा प्रभाव हा सारा
त्याच वीचिंची ही चंचलता, कुठुनि दुज्या थारा।
पुत्र-प्राप्तिच्या आनंदासम इतरिं न गोडि खरी
सुर दानव वा मर्त्य असो तो एकच हृदय परी ।
नभः प्रांगणीं सोडि हळुंच ती क्रीडण्यास त्याला
लीला-कौतुक पाही दावी प्रेमें जगताला ।
शुभ्र वसन परिधान करुनि ह्या दाहि दिशा नटल्या
त्या रिझवाया गाणीं गाती, देह-भान भुलल्या ।
पोटावरि त्या घेउनि सागर खेळवि प्रेमभरें
तन्मृदु कुंतल कुरवाळी हा मारुत हर्षभरें ।
प्रिय भगिनीच्या सोनुकल्याला बघण्या चुंबाया
त्वरा करी अति सरितामाई, हीच वदति माया ।
जननींची ही गडबड बघतां स्वतांहि खेळाया
पुढें तयाशीं निर्झर बालक लोळण घे पायां ।
कडे उचलुनी तया झणीं ती चाले वायु-गति
उषा-सुतहि कर-झांप टाकि निज तदीय तनुवरती ।
गुरुजनांचीं आशिर्वचनें लाभो प्रिय बाळा
दिगंत कीर्ती होवो पुढतीं इच्छा जननीला ।
ब्रह्मांडाच्या अंकावरती ठेवी सुत ह्मणुनी
मोहित झाला अवलोकुनि त्या गाई कवि कवनीं ॥ ७ ॥

*  *  *

## श्लोक.

रंजवी शिशु जसें जननीला, गुंजवी नव कळी भ्रमराला ।
बालभानु रिझवी वसुधेला तेंवि हें कवन हो रसिकांला ॥

[library stamps]

# तत्वज्ञान व व्यवहार.

( लेखक—" शांतिप्रिय " )

तत्वज्ञानी तत्वज्ञानाचा कांहींही अर्थ करोत, पण सर्वांस कळण्यास सुलभ व्हावें, ह्मणून आह्मी तत्वज्ञान ह्मणजे विचार असा अर्थ करणार आहोत. सुगमता व विस्तार अथवा व्यापकता या दृष्टीनें तत्वज्ञान या शब्दाचा हा सोपा अर्थ होईल. क्वचित् असेंहि होईल कीं, तत्वज्ञान हें कारण होऊन विचार हें कार्य होईल. पण या स्थलीं इतक्या सूक्ष्मतेंत जाण्याची अवश्यकता नाहीं.

सृष्टि उत्पन्न कशी झाली असेल ती होवो; पण उत्पन्न झालेल्या सृष्टीचीं कार्यें बिनतक्रार होत असल्यामुळें, ती अशीं घडवून आणणारी शक्ति अत्यंत प्रबळ असली पाहिजे; व ती अगदीं गूढ भार्गी असली पाहिजे. या निसर्गशक्तीच्या कल्पनेचा आपण संकोच केला तर असें वाटतें कीं, प्राणीमात्राच्या अंतःकरणांत सृष्टि-शक्ति अंशतः निवास करित आहे. ह्याच शक्तीला निसर्गशक्ति-स्फूर्ति-अथवा प्रतिभा अशीं नांवें आहेत. याच शक्तीला विस्तारतः विचार नांवें ह्मटलें आहे.

आणखी थोडें असें आहे कीं, विचार, उच्चार व आचार अशा तीन क्रिया आहेत. आचार घडण्यापूर्वी विचार व उच्चार होत असल्यामुळें आचार ह्या कार्यास हीं दोन्हीं कारणरूपच झालीं, अत एव विचार व उच्चार यांच्याबद्दल विचार हा शब्द सामुदायिक झाला.

तत्वज्ञान ह्मणजे विचार हा जसा सुगम अर्थ झाला, त्याचप्रमाणें व्यवहार ह्मणजे आचार असा अर्थ होतो; ह्मणजे तत्वज्ञान व व्यवहार यांचे पर्याय शब्द विचार व आचार हे झाले. कधीं कधीं विचार व उच्चार याअर्थी उच्चार हा शब्द योजितात. तुकाराम महाराजांनीं " बोले तैसा चाले " या अभंगांत बोले याचा अर्थ केवळ उच्चार असा केलेला आहे. कधीं कधीं आलेल्या विचाराप्रमाणें मनुष्य बोलण्यापूर्वी काम करूं लागतो, व कधीं कधीं तो उच्चार करून कामाला लागतो, अथवा त्यास तसें करावें लागतें.

विचार व आचार हे बिंबप्रतिबिंब या न्या-

यानें एकमेकांवर अवलंबून आहेत. तुकारामानें जरी उच्चारास प्राधान्य देऊन तें कारणरूप मानिलें आहे, तरी दोन्हीं कार्यकारणरूपच आहेत. ह्मणजे विचाराप्रमाणें आचार पाहिजे व आचाराप्रमाणें विचारहि पाहिजेत. पण आधीं कोण ? असा प्रश्न केल्यास त्याचें निश्चयात्मक उत्तर देतां येईल, असें नाहीं. लहान मुलें आचार-प्रधान असतात; मोठीं मनुष्यें विचार-प्रधान असतात अथवा कित्येक प्रसंग असे घडून येतात कीं, तें घडून गेल्यावर त्याबद्दलचे विचार उत्पन्न होतात; पण एवढें खरें कीं, मनुष्यांना त्या दोहोंची अत्यंत अवश्यकता आहे. ते एकमेक एकमेकांवांचून पंगू आहेत.

मनुष्यांखेरीज अन्य जीवांचा विचार वर्ज्य करून तुकारामानें आपल्या अभगांत वंद्य मनुष्याबद्दल थोडक्यांत विचार केलेला आहे. "बोले तैसा चाले, त्याचीं वंदावीं पाउलें, असा स्पष्ट इशारा दिलेला आहे. बुद्धिवैभव प्राप्त झालेल्या माणसांना आपण वंदनीय व्हावें असें वाटत असेल तर त्यांनीं विचाराप्रमाणें आचार ठेविला पाहिजे. उलटपक्षीं ज्यांना वंद्यमनुष्याची अपेक्षा असेल, त्यांनाहि वंद्यतेची कसोटी स्पष्टपणें सांगितली आहे. पण यामध्यें थोडासा संकोच होत आहे. या संकोचपानें अशीं वंदनीय मनुष्यें फार विरळा आढळतील, अशी तुकारामाविरुद्ध तक्रार होण्याचा संभव आहे. असा धारवाडी कांटा लावून तोलन केल्यास वंदनीयता फार थोड्यांच्या वांट्यास येईल; पण ती सवय नाहीं, दुष्प्राप्य आहे, असें तुकारामाचें साफ ह्मणणें आहे. रामदासांनीं बडबडणाऱ्या माणसांना थोडीशी सवलत दिलेली आहे. त्यांनीं कार्यावांचून बडबड करूं नका, तर आधीं कार्य करा, मग पाहिजे तर तुमच्या जिव्हेच्या कौतुकाकरितां बडबड करा. जिव्हायंत्राच्या फाजील शोकी माणसांना ही सवलत पसंत पडेल असा अंदाज आहे.

या दोघा सत्पुरुषांनीं असा मोघम व अबाधित नियम केल्यामुळें कित्येक मनुष्यांस अशी वंदनीयता प्राप्त होणें कठीण आहे, असें वाटेल. व पुष्कळ अंशीं तें खरेंहि आहे, हें वर सांगितलें आहे. इतकी थोर वंदनीयता मिळाली नाहीं अथवा ती मिळणार नाहीं असें जाणून कित्येक विचाराविरुद्ध आचार करण्यास तयार होतील; पण तेंहि अयुक्त आहे. क्वचित् प्रसंगीं असाहि अनुभव येईल कीं, विचाराप्रमाणें आचार असतांहि लोकांनीं त्यांस वंदनीय मानिलें नाहीं. उलट आचार भ्रष्टांनाच वंदनीयता प्राप्त झालेली आहे; अशी विषमता पाहून सुवृत्त माणसें दुर्वृत्त होतील. पण हा लोक-मान्यतेचा प्रश्न नसून जीवित कर्तव्याचा—मानव्याचा—प्रश्न आहे; ह्मणून तो स्वकर्तव्याकरितां—मनुष्यपणाकरितां जसा व जितका सोडवेल तितका सोडवला पाहिजे. ही जबाबदारी व्यक्तीवर येत आहे. ही जबाबदारी घेऊन कर्तव्य करण्यास अथवा अकर्तव्याबद्दल प्राप्त होणारे परिणाम भोगण्यास तयार झाले पाहिजे.

आपण व्यक्ति ही व्यक्ति मानितों, पण व्यक्ति ही खरोखर व्यक्ति नाहीं. व्यक्तीच्या

दोघांमिळून "विचार-आचार" असें ह्मणतां येईल व त्यांसही श्रीकृष्णाप्रमाणें "गोष्टी सांगेन युक्तीचा चार" असें ह्मणतां येईल. इतरांस अधिकार नाहीं. भारतीय युद्धाच्या आरंभी श्रीकृष्णानें अर्जुनास मी शस्त्र धरणार नाहीं, पण युक्तीमात्र सांगेन असें सांगितलें होतें. अर्जुनासारख्या प्रख्यात धनुर्धराला कृष्णाच्या विचाराचीच जरूरी होती, हातांत धनुष्य घेऊन युद्ध करण्याची जरूरी नव्हती. भारतीय युद्धांत श्रीकृष्ण विचार अथवा तत्व कथन करीत व अर्जुन तें आचरणांत वळवून दाखवित होता, अशा रीतीनें त्या युद्धकार्यांत तत्व व व्यवहार,—विचार व आचार—यांचें तादात्म्य झालेलें होतें, ह्मणूनच तें विजयी झालें. अशा प्रकारें तत्व व व्यवहार—विचार व आचार—यांचा मधुर संयोग झाल्यावांचून व्यक्ति काय व राष्ट्र काय यांस उन्नति नाहीं, मोक्ष नाहीं. ह्मणून तत्व-स्वरूप श्रीकृष्ण आहे. आचार—क्रिया—स्वरूप अर्जुन आहे, त्यांचा समागम हीच उन्नति, हीच सद्गति किंवा मोक्ष होय.

## एका जिवलग मित्रास.

And when we bed adieu to youth,
Slaves to the spacious world's control;
We sigh a long farewell to truth,
That world corrupts the noblest soul.
Byron.

चाल—चंद्रकांत राजाची कन्या.

रानांमाजी फूल उगवतें, तेथच तें सुकतें,
अगाध जलधींमाजी व्यर्थचि गिरिदुहिता मिळते;
कुणी पाहिल्याविना नभोदरिं तारे चमचमती;
तैशी स्थिति जरि जिवलग सखया तव या भूंवर तीं;

नको करूं रे, खंत मनि मुळीं, नको झुरूं ऐसा !
नको खावूं दिनभरीं या मान तसा पैसा !
द्रव्यलालसा दुःख तुला मी सांगाया नलगे;
कीर्ति न कां ये तव सद्गुणिं रे, आपापचि वेगें ?

२

ह्मणो मूढ जन रानीं व्यर्थचि सुम सुंदर मरतें;
परि नच कां रे वायूलहरीमाजीं तें जगतें ?
सरिता सरसर समावल्या जर वसल्या जलधींत,
सांग अगाधहि पयोनिधी कां दिसता जगतांत ?
दृष्टि न देई अंध ह्मणुनि का तारे नच फुलती ?
तान्यातान्याला नसतो कां ग्रहगण रे भंवतीं ?
जो तो अपुल्या स्थानीं राजा, मन त्याचें राज्य;
येई कोणी जर जिंकाया, शत्रु ह्मणुनि त्याज्य !

३

मन माझें, मी राजा त्याचा, बुद्धि सुखद राणी;
वाल्मीकिज्ञानेशादि कवि गाउंत मज गाणीं;
येउंत सॉक्रेटिस्‌कार्लैलही आह्मां बोधाया;
येवो अर्जुनसखा घेउनी गीता मज गाया;
व्यास पुराणें, शंकर भाष्यें, सांख्यमुनी वचनें,
सिसिरो, डेमॉस्थिनीस् बर्कही देइत व्याख्यानें;
रविवर्म्यानें खुशाल यावें चित्रें घेवोनी;
बोनापार्टीनें पाडावीं राज्यें उलथोनी !

४

वदे न कीं ही सृष्टी सारी स्वप्नस्थितिमधली !
खरें खरें रे, सत्य असे कीं, ती मी अनुभवली !
ह्मणें न मीं कीं, त्वां संसारच सारा सोडावा;
उलट, विनंती सत्त्वगुणांनीं प्रेमें भोगावा.

शांत, सुशिक्षित, सदय, सहिष्णु हि; सुखदा तव मैत्री !

सद्गुणखानिमधिं मणी वसो हा–‘ सुमनाची खात्री !’

आत्मश्रद्धेविना न सद्गुणसुख इहपरलोकीं,

स्वतांच स्वर्गीं जाशिल, पडशिल स्वतांच रे नरकीं !

**नाथ.**

---

# याज्ञवल्क्यस्मृति.

## पाठ ९ वा.

१ मांस खाणें गौण आहे, व भूतदयेला विघातक आहे.

२ मांस खाणें मनुष्याचा धर्म नाहीं.

३ मद्य पिणें शरीरास अपायकारी आहे. आळसास कारण आहे. ह्मणून कोणीही सहसा मद्य पिऊं नये. शिळें अन्न देखील खाऊं नये.

४ पाणी अर्ध्या भोजनानंतर प्यावें.

५ भोजन कमींत कमी तीनदां तरी पाहिजेच.

६ दिवस उद्योगाकरितां आहे. दिवसास सहसा झोंपूं नये, रिकामें कधींही असूं नये, व रात्रीस फार जागूं नये.

७ प्रत्येक मनुष्यप्राणी व वस्तु परमेश्वराचेच अंश आहेत. मनुष्य हा श्रेष्ठ प्राणी आहे, तेव्हां श्रेष्ठानें श्रेष्ठच कृत्यें करावीं. ह्मणूनच मनुष्यमात्राला धर्म लागला आहे.

## पाठ ९ वा.

१ चातुर्वर्ण्य व ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यास हे चार आश्रम पाळावे.

२ गृहस्थधर्म स्वीकारून आपले गृहिणीस गृहलक्ष्मी समजावें.

३ स्वतः सर्व कांहीं शिकून दुसऱ्यांस शिकवणें, स्वतः सन्मार्गावर राहून लोकांस

ज्ञान देणें, स्वतः यज्ञयाग लोकांसाठीं करणें व करवणें, दान घेणें व देणें हें काम ब्राह्मणांचें.

४ क्षत्रियांचें काम राज्य करणें.

५ वैश्यांचें काम सर्व व्यापार आपल्या मुठींत आणणें.

६ नानाप्रकारचे धंदे, रोजगार समाजाकरितां करणें हें समाजरूपी शरीराच्या मूलभूत पायांचें कर्तव्य आहे.

७ पायांस चिमटा घेतला असतां किंवा पाय पोळले असतां तळपायांची आग जशी मस्तकास पोंचते, तद्वत् चारही वर्णांनी एकमेकांकरितां प्रेमानें मिळून मिसळून झटले पाहिजे. ( आमच्या घरांतील स्त्रिया शूद्रच आहेत; काय आम्ही त्यांशीं त्यांच्या शुद्धास्थितांत व्यवहार ठेवीत नाहीं ? )

८ प्रातः पूर्वेस व सायं पश्चिमेस, व सर्वसमयीं उत्तरेस व पितृकार्यार्थ दक्षिणेस तोंड करून आपली धर्मोक्त यज्ञकार्यें आचरावीं.

९ वर्णव्यवस्था जन्म, कर्म उभयतः पालनीय आहे.

१० स्त्रियानीं लहानपणीं पित्याच्या, तरुणपणीं पतीच्या व वृद्धपणीं पुत्राच्या किंवा सर्वदा आप्तांच्याच तंत्रानें रहावें. पण विद्या व कला शिकाव्या.

११ विद्वान्, सत्कर्मशील, प्रौढवय, समाजसेवी, व धनी अशा स्त्रीशूद्रांनाही ब्राह्मण किंवा राजासारखाच—महापुरुषासारखाच—मान द्यावा.

१२ रस्त्यानें वृद्ध पुरुष, समाजहिततत्पर राजा, विद्यार्थी बालक, स्त्री, किंवा रोगी अथवा विवाहाची वरात चालली असतांना अवश्य मान देऊन त्यांना रस्ता सोडून आपण बाजूनें चालावें.

## पाठ १० वा.

### सर्व सामान्य धर्म.

१ नेहमीं लौकर निजून उठावें.

२ आपापल्या धर्मकर्मानुसार ऐहिक व पारमार्थिक व्यापार करावे.

३ देवावर भक्ति ( प्रेम ), धर्मकार्यात श्रद्धा, व उद्योगांत लक्ष ठेवावें.

४ निरंतर आपल्या व आपल्या समाजाच्या उन्नतिचा प्रयत्न करित राहावें.

५ वृथा जीवहिंसा करूं नये.

६ कधींही खोटें बोलूं नये.

७ वस्त्र, पात्र, शरीर, गृह व अंतःकरण ( मन ) निरंतर शुद्ध ठेवावें.

८ कमी बोलवें, व बोलावें तसेंच करित रहावें.

९ इंद्रियनिग्रह व आत्मसंयमन ( वाईट कामांतून अलग राहणें ) हें अवश्य करावें.

१० दान करावें, व गोरगरिबांवर दया करून शक्त्यनुसार मदत करावी.

११ धैर्य धरावें.

१२ चोरी करूं नये.

१३ विद्याकला सेव शिकाव्या.

१४ मनानें ईश्वराचिंतन करित असावें. व एकांतांत सदाच ईश्वरचिंतन करावें.

१५ समाजाचें व स्वराज्याचें काम करित असतांना जनीं जनार्दन पहावा.

१६ परमेश्वर जळीं, स्थळीं, काष्टीं पाषाणीं, आकाश पाताळीं भरून उरला आहे, तो आपल्या बुद्धिध्यानांत सदां असूं द्यावा.

१७ मान धरूं नये व अभिमान (गर्व) व हट्ट ह्मणजे अति दुराग्रह कशाचाही करूं नये.

१८ समाजाशीं—सर्वत्र मनुष्यांशी—विनीततेनें वर्तावें, घमेंड दाखवूं नये.

१९ गुरुजन—विद्वान् साधुसंत—व मातापिता यांची सेवा करावी.

२० स्वधर्मांत विश्वास व दृढनिश्चय ठेवावा.

२१ पुष्कळ उद्योग करावा व पुष्कळ दान—स्वार्थत्यागही करावा.

२२ सर्वांनांच एकदां मरावयाचें आहे एवढ्याकरितां मनांत वैराग्य ठेवावें.

२१ परमेश्वराची भक्ति व पूजा आपल्या वृत्यनुसार व कुलधर्मानुसार अनन्यभावानें व रोजरोज पश्चात्तापपूर्वक करावी.

२४ ज्ञानाच्या गोष्टी समजून घ्याव्या. पण समाजांत खालीं वेदांताचा बकबामात्र सहसा करूं नये.

२५ स्त्रियेनें पतीची अनन्यभावानें सेवा करावी व पतीनेंही स्वस्त्रियांना सहसा दुखवूं नये.

२६ लहान मुलांना शिक्षण देण्याची आवश्य जलदी करावी.

२७ आपल्याला ज्या कोणत्या कामाबद्दल शंका वाटल्यास आपल्यांहून बऱ्याच गुणांनीं श्रेष्ठ पुरुष व आपले मातापिता किंवा प्रौढ आप्त यांना विचारून त्याप्रमाणें त्या नडीच्या प्रसंगीं आचरण ठेवावें.

२८ सर्व पुराणें व इतिहास अवश्य शक्य तेथवर बघावे.

२९ परमेश्वराच्या विभूतींच्या—महापुरुषांच्या किंवा रामकृष्णादिकांसारख्यांच्या अवतारांच्या पुण्यकथाही अवश्य बघाव्या.

# * खरा कवी *

( लेखक—एन. आर. वामणगांवकर. )

करारीपणा आणि कर्तव्यनिष्ठा हीं पौरुषत्वाच्या तेजस्वीपणाचीं लक्षणें होत. हा तेजस्वीपणा अमुक एका दर्जाच्या पुरुषांतच असला पाहिजे असें नाहीं. पंडांत असो किंवा न्यायाधीश असो, कवी असो अगर ग्रंथकार असो, राजा असो अथवा रंक असो जेथें जेथें वरील गुण आढळतील तेथें तेथें मूर्तिमंत पौरुषत्व खेळत असतें. या दोन गुणांच्या अभावीं विद्वत्ता, श्रीमंती, सत्ता आणि शौर्य हीं कितीही प्रमाणावर अधिक असलीं तरी तीं मृतप्रायच समजलीं जातात.

जर्मन बादशहांनीं सध्या जो इतर राष्ट्रांच्या स्वातंत्र्यावर आपल्या लष्करी सामर्थ्याच्या घमेंडींत गदा घालण्याचा प्रयत्न चालविला आहे ह्मणून ह्मणण्यांत येतें तसाच प्रयत्न त्रिकाळ देशाधिपती सामंतराज यांनीं कांहीं शतकापूर्वी इतर देशाच्या स्वातंत्र्याचा अपहार करण्याचा खरोखरच अव्याहत प्रयत्न चालविला होता. एकदा मरुळदेश काबीज करून तेथील जनतेवर आपल्या अव्याढव्य सत्तेचा झेंडा उभारून राजाधिराज सामंत राजाची स्वारी राजधानीस परत आली. तेव्हां या दिग्विजयाप्रित्यर्थ राजधानींत मोठा उत्सव झाला. या उत्सवांत शास्त्री, पंडीत; कवी; व इतर मंडळींना खैरात वाटण्यांत आली होती. दरबारांत जाऊन प्रत्येकानें स्तुतिपाठ ह्मणावा व खैरात घेऊन परत जावें असा क्रम सुरू होता. करारीपणा व कर्तव्यनिष्ठा या गुणांच्या अभावी जे विद्वान शास्त्री पंडित व कवी होते त्यांनीं राजाधिराज खुष होतील अशीं स्तोत्रें गायलीं व खैरात घेऊन आनंदानें परत गेले. सर्वांची बिदागी झाल्यावर दरबारांत सिंहासनारूढ असलेले सामंतराज आपल्या राजकवीला उद्देशून मोठ्या गंभीरपणानें ह्मणाले कीं, " कवीवर्य ! आतांपर्यंत आमची स्तुति ह्मणून जी कवीता गायली गेली ती कशी काय आपल्याला आवडली " सामंतराज असा प्रश्न करून राजकवीच्या

चेहऱ्याकडे काय उत्तर येतें ह्मणून आनंदानें टकमक पाहूं लागले. पण राजकवीनें कांहींच उत्तर दिलें नाहीं. तो क्लेशयुक्त अशी सचिंत मुद्रा करून आपल्या आसनावर खालीं मान घालून बसला होता. कवीची दीनचर्या व मूकवृत्ति पाहून सामंतराज पुन्हा ह्मणाले कीं, 'कवीवर्य, आजच्या आनंदाचें प्रसंगीं आपली अशी दीन मुद्रा कां! आमच्या दरबारांतील सर्व सरदार आणि दरकदार आज आनंदांत आहेत. सारी प्रजा मोठ्या उल्हासानें आमचा दिग्विजयोत्सव साजरा करण्यांत दंग झाली आहे आणि आपणच आज असे खिन्न कां? आपणांवर कांहीं खाजगी अरिष्ट कोसळलेलें असेल तर सांगा मी त्याचें लागलेंच निरसन करतों. मात्र तें दैवीआपत्तीचें नसावें.' यावर राजकवी उत्तरले—'महाराज, खाजगी अरिष्टांना भिणारा मी नाहीं. दैवी आपत्तीनें माझ्यावर केवढेही वज्राघात केले तर मी डळमळणारा नव्हे.'

'मग असें उदासीन कां? आमच्या स्तोत्राकरितां जो काव्यरस आतांपर्यंत दरबारांत वहात होता त्यांत कांहीं काव्यरसाला बाधक होते होय? ह्मणे कवीपुढें निरस काव्य आलें असतां त्याला त्या निरस कवीचा संताप येतो. सांगा. तसा कांहीं प्रकार झाला असेल तर आह्मांला सांगा. ह्मणजे काव्यांतील थोडीबहुत खुबी आमच्याही लक्षांत येईल.' यावर गंभीर मुद्रेनें राजकवी ह्मणाले कीं, 'नाहीं. राजन्, तसा कांहीं प्रकार घडला नाहीं. आतांपर्यंत दरबारांत जो काव्यनदाचा प्रवाह वाहत होता. तें काव्य नव्हतें असें कोण ह्मणेल! परंतु तें काव्य द्रव्याच्या स्फूर्तीचें होतें. शुद्ध अंतःकरणाच्या प्रवाहापासून निर्माण झालेलें नव्हे. स्त्री सुंदर असली, तिनें सौंदर्यांत भर घालण्याकरितां वस्त्रालंकाराचा कितीही भरणा केला तरी सौभाग्याची खूण ह्मणून कुंकुमतिलक तिच्या कपाळीं पाहिजे. त्याशिवाय सौंदर्याला किंमत काय? आतांपर्यंत प्रसवलेली कविता सुंदर खरी पण ती रंडा होती. ह्मणून सहृदय कवि तिला कविता ह्मणत नाहीं. कुंकवाच्या टिळ्यावांचून जशी सुवासीण रहात नाहीं तशी खरी कविता शूर अंतःकरणाच्या स्फूर्तीवांचून प्रसवत नाहीं. द्रव्याच्या किंवा लौकीकाच्या लालसेनें जन्मास आलेली कविता, कविता नसून तोंडचोमडेपणाच्या व वृथाभिमानाच्या गढूळ ओढ्याचा तात्पुरता प्रवाह होय.' ओष्ठांच्या कंपवृत्तींतून व अंतःकरणांपासून जेव्हां वरील प्रमाणें राजकवीनें रोखठोक जबाब दिला तेव्हां सभासद थक्क झाले व प्रत्येकजण साशंक मुद्रेनें राजाकडे पाहूं लागला. आणि याचा परिणाम पुढें काय होतो हा विचार प्रत्येकाच्या मनांत घोळूं लागला. ज्या सामंतराजाच्या मनावर शत्रूच्या प्रचंड तोफांचा परिणाम यत्किंचितहि होत नसे तोंच सामंत राजकवीची स्पष्टोक्ति ऐकून क्षणभर थक्क झाला. आणि अंतःप्रवृत्ती दाबून विस्मयानें ह्मणाला "कवीराज, मग

तुह्मी करा पाहूं या दिग्विजयोत्सवावर काव्यरचना.' यावर कवी सद्गदीत होऊन ह्मणाले, 'महाराज, माफ करा. माता सरस्वती काव्याला स्फुरण देण्याकरितां जिव्हाग्रावर आरूढच होत नाहीं.'

'कां बरें आरूढ होत नाहीं?' सामंतराज जरा गुर्मीनें बोलले. राजाच्या मुखांतून निघालेलें गुर्मीचें वाक्य ऐकून राजकवीनेंही तितक्याच जोमदारपणानें जवाब दिला.

'देवी सरस्वती लक्ष्मीची गुलाम होऊं इच्छित नाहीं. लक्ष्मीच्या चंचल वृत्तीबरोबर धिंगाणा घालणें हें माता सरस्वतीचें ब्रीद नव्हे.'

'नाहीं. आह्मी ह्मणतो—आमचा हुकूम ह्मणून तुह्मी या दिग्विजयोत्सवावर काव्यरचना केलीच पाहिजे.'

'राजन्, क्षमा करा. यावेळीं ही जिव्हा काव्यरत्नाला प्रसवणार नाहीं. आणि प्रसवली तरी त्यापासून आपल्याला आनंद होणार नाहीं.'

'नाहीं. आमच्या आज्ञेबरहुकूम तुमची जिव्हा नाचलीच पाहिजे. आमच्या आनंदाबरोबर तुमच्या जिव्हेला आनंद वाटला पाहिजे.' सामंतराजाचा हट्ट जेव्हां वरीलप्रमाणें विकोपास जाऊं लागला तेव्हां राजकवी गंभीरतेनेंच ह्मणाले कीं,

'राजन्, कवीची जिव्हा ह्मणजे फाटक्या वस्त्राकरिता वाटेल त्याची वाटेल ती स्तुति करणाऱ्या भाटाची जिव्हा नव्हे. कवीची जिव्हा लक्ष्मीला बद्ध झालेली नसते. तिच्यावर सत्ताधिशांच्या सत्तेचाही अंमल चालत नाहीं. कवीची जिव्हा जर कुणाची गुलाम असेल तर ती अबाधित सत्याची होय. सत्य प्रसवणें, सत्याचा प्रसार करणें, सत्याचें बिजारोपण करणें, असत्याच्या रोगानें मृतप्राय झालेल्या समाजांत सत्याचें नूतन जीवित निर्माण करणें हें कवीच्या जिव्हेचें कर्तव्य आहे.''

कवीच्या मुखांतून निघालेले वरील गंभीर व निश्चयी उद्गार ऐकून राजा सामंताच्या मनाला धक्का बसला. सभासदांत खळबळ उडाली. जो तो आपसांत कुजबुजुं लागला. 'खरा कवि' ह्मणून जो तो मनांत तारीफ करूं लागला पण उघडपणें बोलण्याची एकाचीही छाती होईना. उघडपणें जरी कुणी बोलूं शकले नाहींत तरी प्रत्येकाच्या अंतःकरणांत कवीच्या मुखांतील सहज शब्दांनीं सत्याचा प्रकाश पडला. याबरून कवीचा सहज शब्द ह्मणजे अंतःकरणाला चटका लावणारें प्रतिभावान काव्य असतें असें नाहीं कां सिद्ध होत? काव्य गद्य असो अगर पद्य असो मनोवृत्तींना सत्याच्या साच्यांत घालण्याची ज्यांत शक्ती असेल तेंच खरें काव्य! अस्तु. कवीचीही स्पष्टोक्ती सामंतराजाला सहन झाली नाहीं. यावर काय बोलावें हें त्याला सुचेना. निरुत्तर होणें हेंही कमीपणाचें आहे असें वाटून तो रागानें ह्मणाला.

'तुह्माला दरबारी कवि नेमून जो पगार मिळत आहे तो असल्या उत्तराकरितां नव्हे.

आह्मी पुनः हुकूम करितों कीं, इतर कवींप्रमाणें तुह्मी आमची स्तुति केलीच पाहिजे.'

'दरबारांत असत्याचा प्रकाश पाडण्याकरितां आपण मला ठेवणार असें जर मला कळलें असतें तर मी दरबारांत राहिलोंच नसतों. आपली स्तुति--आपली स्तुति काय ह्मणून मी करावी हें मला समजत नाहीं. स्तुति करण्यासारखे कोणते गुण आपल्या अंगांत आहेत? नसते गुण आहेत असें कल्पून व्यर्थ स्तुतिपाठानें मी माझी जिव्हा विटाळणार नाहीं.'

पुरे कर. अधिक नखबड करूं नकोस. आजपर्यंत जशी आमची स्तुति केली तशीच आतांही केली पाहिजे. तसें जर बिनचुक घडलें नाहीं तर जिव्हा छाटण्यांत येईल.' असें जेव्हां सामंतराजानें निक्षून सांगितलें तेव्हां कवीही पुढें अधिकच निरपेक्षतेनें बोलूं लागले.

'जिव्हा छाटण्यांत आली तर येऊं द्या. पण व्यर्थ स्तुतिचा एक शब्दही जिव्हा उच्चारणार नाहीं. आजपर्यंत मी स्तुति केली खरी; पण तेव्हां स्तुति करण्यासारखे गुण आपल्यांत होते. आतां मात्र त्या गुणांचा अभाव दिसतो. आपण सत्ता वाढविण्याची महत्वाकांक्षा धरलेली आहे. आणि ती पूर्ण करण्याकरितां दुसऱ्या निरपराधी व दुबळ्या राष्ट्रांना घशांत ओतण्याचा सपाटा सुरू केला आहे. आपण चक्रवर्ती असाल पण चक्रवर्तीचें आपल्यांत कोणतेंही लक्षण असलेलें दिसत नाहीं. दुबळ्या राष्ट्रांना बंधमुक्त करून त्यांना स्वातंत्र्याच्या हवेंत संचार करूं देणारा आणि त्यांचें रक्षण करणाराच खरा चक्रवर्ती. आपण असे चक्रवर्ती नाहीं ह्मणून मी आपली स्तुति करीत नाहीं.'

'मग मरणास तयार हो.'

'मी मरणास तयार आहें.'

'कोण आहेरे! पकडा या हरामखोराला. आणि न्या सुळावर आतांच्या आतां. आमची अवज्ञा करणाराला असेंच देहांत प्रायश्चित्त दिलें पाहिजे.

'धरा. पकडा मला आणि न्या सुळावर. सत्याकरितां मरण्याचा आलेला प्रसंग मी तरी कसा टाळूं?' राजानें पकडण्याकरितां हुकूम केला व कवीनींही पकडा ह्मणून सांगितलें पण कुणींच पुढें होईनात. तेव्हां सामंतराज अधिक क्रोधयुक्त होऊन ह्मणाला. 'माझा हुकूम सुटला असतां कुणीच कसें पुढें होऊन या हरामखोराला कैद करीत नाहींत" शेवटीं शिपायांनीं कवीला कैद केलें व दरबारांतून घेऊन चालले. जातां जातां कवी गंभीरपणानें ह्मणाला. 'राजा, सत्याकरितां माझा आत्मयज्ञ होत आहे ह्मणून मी आनंदानें सुळावर जात आहें. पण व्यर्थ स्तुतिनें फुगून जाऊन असत्याची कास धरूं नकोस व सत्याला विसरूं नकोस. माझा मृत्यु तुझ्या अंतःकरणांत घर करून राहील आणि तुला ताळ्यावर आणील अशी माझी मनोदेवता मला सांगत आहे. मला मरणाची शिक्षा झाली तरी माझें मन मृत्यूला पाहून डळमळलें

नाहीं पण तुझ्या नेत्रांतून मात्र अश्रूंचा प्रवाह सुरू झाला. होऊं दे. मनाला पश्चात्ताप होऊं दे ! मनःशुद्धी झाल्यावर सत्याचा प्रकाश आपोआपच तुझ्या अंतःकरणांत पडेल. चला मला घेऊन. ' असें ह्मणून कवि शिपायाबरोबर जाऊं लागला तोंच सामंताचें मन द्रवलें आणि ह्मणाला 'शिपायानों, थांबा. त्यांना घेऊन जाऊं नका त्यांना मोकळे करा. ' असें ह्मणतांच शिपायांनीं कवीला बंधमुक्त केलें. राजा कवीला दीनवाणीनें ह्मणाला, कवीवर्य! सत्याकारितां मी काय करावेसें आपणाला वाटतें ! '

' बंदीवान केलेल्या राजांनां बंधमुक्त करावे, आणि त्यांचें राज्य त्यांना द्यावें व आपण प्रसंगीं त्यांचें रक्षण करावें '.

ठीक आहे ' असें ह्मणून सामंतानें सर्व राजांनां बंदींतून मुक्त केलें व त्यांचा सन्मान करून त्यांचें राज्य त्यांना परत दिलें. नंतर राजकवीनें सामंतराजाची स्तुति केली. त्यावेळचा आनंद अपूर्व खरा.

कवीच्या शब्दांत केवढी जादू असते ! जें काम प्रचंड तोफांनीं होत नाहीं. हजारों वीरांच्या बलीदानोंनें होत नहीं. ते कवीच्याखऱ्या कवीच्या शब्दानें होतें. ज्या पतित राष्ट्रांत मनोवृत्तीनां जागृत करणारे वरीलप्रमाणें कवी निर्माण होतात तेंच राष्ट्र उदयाचलावर येतें. कवि हा योद्धा नव्हे—मुत्सद्दी नव्हे—तर चैतन्याची प्रज्वलित ज्योत होय. या ज्योतीच्या प्रकाशांतच असत्याचें प्रचंड खडक दृष्टीस पडतात व त्यापासून बचाव करितां येतें. तात्पर्य काय कीं, जनतेंत आपल्या शब्दानें चैतन्य निर्माण करणाराच खरा कवि ! याशिवाय काव्याचे कितीही गुण कवींत असले तरी ते फोलच !

# धर्मो विश्वस्य जगतः प्रतिष्ठा ।

( भाग २ रा. )

गेल्या फेब्रुवारीच्या अंकांत या विषयाचें विवेचन करतांना, सनातनधर्माचें मूळ उद्दिष्ट—जगताची सुस्थिती कायम राहण्याकरितां प्राणिमात्रांचा इहलोकींचा प्रपंच—व्यवहार सर्वबाजूंनीं समाधानकारक होऊन अंतीं त्यांनां पारलौकिक सद्गति मिळावी, हेंच असून धृतिक्षमादि आचार विचार हीं केवळ धर्माचें हें उद्दिष्ट साध्य करण्याचीं साधनें होत असें सांगितलें आहे. त्यावरून धर्मानें उन्नतीच होते हें स्पष्ट कळून येईल.

धर्माच्या ह्या उद्दिष्टाची पूर्णावस्था होण्याचीं दोन अंगें धर्मशास्त्रांत सांगितलीं आहेत. एक प्रवृत्ति व दुसरें निवृत्ति. इहलोकींची प्रपंच—यात्रा सर्वांगसुंदर होण्याकरितां प्रवृत्तीच्या अंगाची आवश्यकता असते, व पारलौकिक सद्गति मिळण्याकरितां निवृत्तीच्या अंगाची आवश्यकता असते. धर्माची कार्यसिद्धि होण्यास ह्या दोन्ही अंगांचें संपादन झालें पाहिजे; केवळ एकाच अंगाची भर होऊन भागणार नाहीं, ही गोष्ट ' यतोऽभ्युदयो निःश्रेयस् सिद्धिः ' इत्यादि सूत्रवचनांवरून उघड होते. त्यांतही प्रवृत्तिमार्ग हा निवृत्तिमार्गाचा आधार असून निवृत्तिमार्गाचें आवलंबन करण्याला प्रवृत्तिमार्गाचें प्रथम यथासांग अवलंबन करणें अत्यंत आवश्यक आहे हें विचारांतीं कोणासही प्रांजळपणें कबूल करावें लागेल. उघडच आहे; हा देह सजीव राहील तरच पारमार्थिक उन्नतीला पोषक अशीं धर्मकर्में करतां येतील, एरव्हीं तीं करतां येणार नाहींत व देह जिवंत राहण्याकरितां अन्नपाणी, घरदार, वस्त्रप्रावरण इत्यादि सामुग्रीची प्रथमतः तरतूद करणेंच भाग पडतें. देहधारणेला आवश्यक अशा ह्या साधनांचा पुरवठा नसला तर परमार्थ—साधन ही गोष्ट मृगजळानें तहान भागवूं पाहण्याइतकेंच दुष्कर होय. लाडू किंवा जिलबी हा पदार्थ जरी मोठा गोड ह्मणून हवासा वाटतो तथापि तो तयार करण्याकरितां तूप, साखर व गव्हाचें पीठ अथवा दुधाची योजना, उंसाची लागवड व गव्हांचा पुरवठा हीं साधनें अगदीं आवश्यक असतात. आणि लाडू खाण्याची इच्छा पूर्ण करण्याकरितां प्रथमतः हीं

साधनें मिळविणें हें पहिलें कर्तव्य होय. त्याचप्रमाणें मोक्षादि पारलौकिक–ऐश्वर्यप्राप्तीला सहायक अशा देहधारणेला आवश्यक असणारीं साधनें संपादन करणें हें साधकाचें प्रथम कर्तव्य होय ही, गोष्ट विसरतां कामां नये. ' आधीं प्रपंच करावा नेटका । मग घ्यावें परमार्थ विवेका ॥ प्रपंच सांडूनि परमार्थ कराल । तरी तुम्ही कष्टी व्हाल ॥ ' ही समर्थासारख्या धर्मप्रसारक ऋषींची शिकवण पुरातन काळापासून प्रजेला उपदेश करीत आहे ज्याला आपली उन्नत्ति व्हावी, आपणांकडून धर्माचें यथासांग आचरण घडावें, असें वाटत असेल त्यानें ह्या धर्माज्ञेचा भंग करून कधींही चालावयाचें नाहीं. ह्या परंपरागत शिकवणीचा अनादर करून कधींही भागावयाचें नाहीं. प्रथम प्रपंच नंतर परमार्थ हीच धर्माची शुद्ध सांगड असतां व हा राजमार्ग सनातनधर्मानुयायी प्रजेकरितां धर्मप्रसारक अशा महर्षींनीं घालून दिला असतां, सांप्रत या भारतवर्षांतील मोठमोठे धर्म–मार्तंड ह्मणविणारे सूज्ञ लोक ह्या मूळ पायाची बिघडलेली घडी नीट करण्यापेक्षां केवळ सोंवळ्याओंवळ्याचें बोचकें बळकट धरून एखाद्या कोठडींत बसणें ह्यातच अधिक पुरुषार्थ समजतात; पण सांप्रत ची हें ध. धर्मदृष्ट्या कव्हांही श्रेयस्कर गणलें जाणार नाहीं, हें विचारांतीं त्यांना खचित् कळून येईल.

जें कर्म प्राणिमात्रांच्या इहपारलौकिक उन्नतीला कारण व सहाय्यक होत नाहीं, किंवा ज्याच्या योगानें जगताची स्थिती समाधानकारक राहण्यास मदत होत नाहीं तें कर्म निःसंशय धार्मिक नव्हे, किंबहुना तें अधार्मिकच होय, असेंही ह्मटल्यास चालेल. हिंदुधर्मशास्त्रांत ह्या गोष्टीकडे विशेष लक्ष्य दिलें असून धर्माची व व्यवहाराची सांगड त्यानें अगदीं एकजीव करून टाकिली आहे. ब्रह्मज्ञान संपादन करणाऱ्या ऋषींनीं योगादि साधनांनीं स्वबल वाढवावें व शापादपि–शरादपि शक्तीच्या सहाय्यानें सर्व जगतावर वर्चस्व गाजवावें, असें धर्माचें निक्षून सांगणें आहे. ब्रह्मज्ञानानें ब्राह्मणाला जी सद्गति शास्त्रानें मिळत असते तीच धर्मयुद्धांमध्यें कोध्यावधि शत्रूंच्या माना तोडीत असतां मृत्यु येणाऱ्या शूर क्षत्रियालाही मिळत असते, ही धर्मशास्त्राची प्रतिज्ञा आहे. ह्या एकाच गोष्टीवरून प्रपंच व परमार्थ अथवा ऐहिक किंवा पारमार्थिक उन्नतीचें समान महत्व कोणाच्याहि ध्यानांत येईल. पारमार्थिक कल्याण साधण्याकरितां कडकडीत सोंवळ्याओंवळ्याचें बंधन पाळण्यांत येतें. पण ह्या बंधनालाही सनातन धर्मशास्त्रांत प्रपंचाचा आधार आहे हें कोणासही नाकबूल करतां यावयाचें नाहीं. स्यांतून गतांना एखाद्या ओंवळ्या चिंधीवर न पडताच स्नानशुद्धीचें प्रायश्चित्त सांगणाऱ्या धर्मशास्त्रानें रक्तानें लिडबिडलेलें मृगाचें किंवा व्याघ्राचें चर्म ऊर्फ कातडें चांगल्या कडकडीत सोंवळ्यांत वापरण्याची आज्ञा केली आहे. उपनयनाचे वेळीं यज्ञोपवीतासारख्या अत्यंत पवित्र

अशा वस्तूलाही तें बांधण्याचा धर्मविधी शास्त्राधारें करावा लागतो. 'दृष्टि आड सृष्टि' ह्मणून ओंवळ्या चिंधीवर नुसता पाय पडला तर कांहीं सोंवळें विटाळत नाहीं; तर तें दृष्टीस येईल तरच हा सोंवळ्या ओंवळ्याचा निर्बंध पाळावा लागतो. साखर, गुळ, तूर, दहीं, दूध इत्यादि न धुतां येणारे पदार्थ कोणाच्याहि हातचें असलें तरी सोवळ्यांत वापरायास—नव्हे पोटांत कोंबण्यास—शास्त्राची कांहीं आडकाठी नसते. नळाचें पाणी कोठून व कोणकोणत्या जातीच्या स्पर्शानें दूषित होऊन येतें. इतकी माहिती बहुधा सर्वांना असतेच. तथापि त्यावर बहिष्कार घालण्याची कोणासही शास्त्रानें बंदी होत नाहीं. इत्यादि गोष्टींचा सूक्ष्म विचार केला ह्मणजे 'आधीं प्रपंच करावा नेटका।' ह्या धर्माज्ञेचें रहस्य चांगलें ध्यानांत येईल. आपला ऐहिक प्रपंच नीट करण्याकरितां शास्त्रानें आपले निर्बंध इतके सैल केले असतांही सार्वजनिक नळावरून धाबळी नेसून पाणी आणणाऱ्या ब्राह्मणाला ह्या सोंवळ्याओंवळ्याचे निर्बंध पाळतां पाळतां कसे नाकीं नव येतात, हें सर्वांनाच ठाऊक आहे. व्यवहार—प्रपंचांत अशा पदोपदीं नडून जाणाऱ्या प्रजेचा प्रपंच किती सुखाचा असतो हें कांहीं कोणासही सांगावयास नको. ज्यांचा ऐहिक प्रपंचच असा डोकें भणभणवीणारा असतो त्यांना परमार्थाला अवश्य असणारें चित्त समाधान वा चित्तशुद्धि कोठून असणार, हें उघडच दिसतें!

अर्थात् अशा प्रजेची 'अत्रीं ना परत्रीं' अशी निराधार स्थिति होऊन त्यांना इहपारलौकिकसद्गति मिळणें ही गोष्ट तेलानें प्रज्वलित अग्नि विझविण्यासारखेंच दुष्कर होय.

ज्या व्यक्तीचा प्रपंच नीट आहे तीच व्यक्ति परमार्थाचें साधन करण्यास पात्र असतें. हें वरील विवेचनावरून कोणासही कबूल करावें लागेल. एवढ्याकरितां, प्रथम प्रत्येकाचा प्रपंच नीट असला पाहिजे. पण या जगांत सज्जनांपेक्षां दुर्जनांचीच संख्या अधिक असल्यामुळें त्यांच्याकडून धर्माच्या ह्या उद्दिष्टाला वारंवार अडथळा येत असतो. शेत नांगरून वखरून तयार केल्यावर त्यांत बिजारोपण करणाऱ्या सात्विक वृत्तीच्या शेतकऱ्याच्या मानेवर सुरी ठेवून शेतांतील नगदमाल आपल्या खिशांत भरणाऱ्या दुर्जनांचीच संख्या जगांत अधिक असल्याचें पुरातन काळापासून आपणांस आढळून येते. वसिष्ठमुनींपासून नंदिनीसारखें रत्न उपटणाऱ्या विश्वामित्रांचाच भरणा जगांत विशेष असल्याचें आपण पाहतों. अर्थात् अशावेळीं व्यक्तीला आपला प्रपंच नीट राखतां येत नाहीं. ह्मणून संघशक्तीनें धर्माचें हें कार्य करणें धर्मदृष्ट्या फार आवश्यक असतें. जगांत निरनिराळे समाज व निरनिराळीं राष्ट्रें आणि त्यांच निरनिराळे मर्यादित धर्मपंथ याच धर्म—हेतूनें अस्तित्वांत आलेले आहेत. साऱ्या जगाच्या पाठीवर कोरडे ओढणारी सुलतानी नाहींशी करण्याकरितांच निरनिराळे **राष्ट्रसंघ** बलवान् असणें धर्मदृष्ट्या अत्यंत महत्वाची बाब आहे. हिंदी राष्ट्र हा असाच एक धर्म-

रक्षक संघ असून त्याजकडून धर्माचें हें सत्कार्य बरींच वर्षें अबाधितपणें चालू होतें. पण आज त्यानें आपल्या प्रपंचाकडे दुर्लक्ष्य केलें असल्यामुळें सनातन धर्माची ही ईश्वरी कामगिरी इतःपर बजावणें त्याला अत्यंत अवघड झालें आहे; हें खरोखर त्याचें दुर्दैवच होय. जगद्रक्षणाची ही बहुमोल कामगिरी बजावण्यास जी व्यक्ति अथवा संघ समर्थ नसतो ती व्यक्ति किंवा तो संघ ' व्यर्थ जन्मुनीयां शिणवली जननी । होय रंक जनीं भारभूत ॥ ' असाच होय हें आपलें परंपरागत कर्तव्य बजावण्याची हिंदी राष्ट्रांताल धर्ममार्तंडाची इच्छा असल्यास, हिंदी राष्ट्राचा प्रपंच कशानें नीट होईल, ह्याचा अखंड विचार (साचार) केला पाहिजे. राष्ट्र हें व्यक्तीचें घर होय, राष्ट्र जिवंत राहील तरच व्यक्तीचें जीवन जगूं शकेल, हा सिद्धांत असल्यामुळें व जगद्धिताला राष्ट्रीय सामर्थ्य अत्यंतावश्यक असल्यामुळें प्रथम आपलें हें भंगलेलें घर दुरुस्त करणें हेंच धर्माचरण असेच आज प्रथम कर्तव्य होय.

जगद्धितकारक अशा ह्या धर्माचें आचरण आपणांकडून घडून आपली त्रिखंड–कीर्ति नेहमीं कायम रहावी ह्मणून या भारतवर्षांतील मोठमोठ्या धर्मप्रसारक महात्म्यांनीं प्रसंगोपात् ' आपद्धर्म ' ह्मणून सामान्यतः अधार्मिक अशा अनेक गोष्टी केल्या आहेत. व त्या सर्व ' धर्माच्या ' नांवाखालीं खपल्या व खपत आहेत. धर्मात्म्या परशुरामानें मातृहत्येचें भयंकर पातक माथीं घेतलें. श्री रामचन्द्रासारख्या धर्मनिष्ठानें वालीचा वध करतांना धर्ममर्यादेकडे पाहिलें नाहीं, अथवा लोकसंग्रहाकरितां स्वपत्नीच्या केविलवाण्या याचनेकडे लक्ष दिलें नाहीं. धर्मार्जुनासारख्या अंशधारी धर्मरक्षक पुरुषांनीं, लक्षावधि बांधवांचा संहार करण्याचें सोडून वानप्रस्थाश्रमाची वाट धरली होती, यांत त्यांनीं काय वाईट केलें होतें ? पण धर्मशास्त्रानें तसें त्यांना न करूं देतां भीष्मद्रोणांसारख्या गुरुजनांची आणि कर्णदुर्योधनादि प्रत्यक्ष बंधूंची मान तोडावयास भाग पाडलें. बिभिषणानें घरभेदीपणाचें नरकाला पोंचविणारें अनुचित कर्म करून आपल्या भावाला धुळीस मिळविलें व धर्मानें प्राप्त होणारी सद्गति मिळविली. प्रत्यक्ष कृष्णपरमात्म्यानें कंस–शिशुपालादि आप्तांच्या छिंदल्या उडविल्या धर्म व ज्ञानश्रेष्ठ अशा व्यास महर्षींनीं प्रत्यक्ष आपल्या बंधुपत्नीशीं संभोग करून कुलवंशाचें रक्षण केलें. समर्थ रामदासांनीं आपल्या मातापित्यांचीं मनें दुखविणारा गृहत्याग केला. तपोनिष्ठ विश्वामित्रानें श्वानमांस भक्षणाकडे धांव घेतली. आणि हें सारें कशासाठीं, तर आपणांकडून जगद्धिताच्या धर्म–कार्यास मदत व्हावी एवढ्यासाठीं !

जगताचें हित होणें हें धर्माचें मुख्य कार्य आहे. आणि तें कोणत्या कर्मानें होईल हें त्या कर्माच्या परिणामाकडे लक्ष्य देऊन केलें पाहिजे. सत्व, रज, तम ह्या तीन गुणांचीं कर्में असतात; आणि सात्विककर्में हीं रजस्तमोगुणी कर्मा-

पेक्षां विशेष अनुकरणीय असतात असें मानण्यांत येतें. पण महाजनांच्या मार्गाचें अवलोकन केलें असतां असेंच स्पष्टपणें कळून येईल कीं कर्माचा सात्विकपणा अथवा तामसीपणा त्यांच्या जातीवर अवलंबून नसून केवळ तो त्यांच्या परिणामावरच अवलंबून असतो. सत्य भाषण करणें हें सात्विककर्म खरें पण त्यामुळें जर राष्ट्राचा किंवा जगाचा नाश होण्यास मदत होत असेल तर तें सत्यभाषण धर्मदृष्ट्या कधींही श्रेयस्कर ठरणार नाहीं. त्याचप्रमाणें खून करणें हें तामसीकर्म खरें पण एकाद्या दुष्ट चोराकडून जर जगाला किंवा समाजाला 'हाय हाय' करण्याची पाळी आली असेल तर त्याचा वध करणें हेंच धर्मदृष्ट्या अधिक श्रेयस्कर होय. वर जीं आपद्धर्माचीं उदाहरणें सांगितलीं आहेत त्यांचेंही रहस्य हेंच आहे. तमोगुणी कर्में असलीं ह्मणजेच कांहीं तीं टाकावू ठरत नसतात. नाहींतर तमोगुणाचा मूर्तिमंत पुतळा जो भगवान् शंकर त्याला महादेव कोणीही ह्मटलें नसतें. यावरून जगद्रक्षणाला जीं कर्में वेळेवर करणें भाग पडेल तींच करणें हा धर्म होय, ही गोष्ट कळून येईल. कर्माचा परिणाम पाहिला ह्मणजे एकादा प्रवाशी जर तृषेनें व्याकूळ होऊन पाण्याकारितां तडफडत पडला असेल तर अशा वेळीं त्याला शेंकडों तोळे सोनें बक्षिस देण्यापेक्षां दीड दमडी किंमतीचें एक लोटाभर थंडगार पाणी पाजणें हाच धर्म होय. ह्यांतही आणखी एक सूक्ष्म विचार पाहणें अवश्य असतें कीं—पाणी पाजून वांचविलेला हा प्रवाशी जगल्यास जगाच्या नाशास कारणीभूत होईल कीं काय? जर तो असा असेल तर पाणी पाजणें हें कर्म धर्म्य ठरणार नाहीं. साखरेचें सरबत गोड असलें तथापि तापाच्या माणसास तें अपायकारकच होय. त्याला क्विनाईचें डोसच दिले पाहिजेत असें धर्मशास्त्राचें सांगणें आहे. विंचू, साप, वाघ, सिंह इत्यादि दुष्ट प्राण्यांना मारणें हा, ह्याच न्यायानें धर्म होतो. रावणासारख्या उन्मत्ताला मारणें हा ह्याच न्यायानें धर्म ठरतो. अशा दुर्जनांची मस्ती जिरविण्याला अर्थात् जगताची सुस्थिती कायम राहण्याकरितां सर्व प्राणिमात्रांच्या इह व पारलौकिक कल्याणाला विघातक होणाऱ्या विघ्नांचा परिहार करण्याला—जगांत सबळ व्यक्तींची आवश्यकता असते. व जेव्हां एका व्यक्तीकडून धर्माचें हें कार्य होणें अशक्य असतें तेव्हां मोठमोठ्या बलवान् संघांची तेथें आवश्यकता असते. नाहींतर प्रचंड अशा वडवानलांत पंचपात्रीभर पाणी जसें क्षणार्धांत भस्म होऊन जातें त्याचप्रमाणें दुर्जन—संघाच्या धडकीसरशीं ह्या व्यक्तीच्या चिंधड्या उडून जाऊन धर्म—कार्याची गति अपूर्णावस्थेंतच नष्ट होऊन जाईल. एवढ्याच करितां व्यक्तीनें आपलें सामर्थ्य प्रथम राष्ट्रांत ओतून वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें रा ूपीं आपलें घर समर्थ केलें पाहिजे. बाग लुटली जाऊं नये ह्मणून कांटेरी कुंपण त्याच्या भोंवतालीं नीट घातलें पाहिजे, हें बागवानाचें प्रथम कर्तव्य होय. यावरून, परमार्थाच्या इमारतीला आधारभूत असलेला हा प्रपंच नीट करणें आपणा

हिंदपुत्रांचें आद्य कर्तव्य होय, हें कोणासही कबूल करावें लागेल. आणि हा प्रपंच नीट होण्याकरितां चालू परिस्थितीला लागू पडणाऱ्या कर्मांचें आचरण करणें हाच **सनातन-धर्म** होय.

हल्लीं धर्म या सदरांत आह्मी ज्या कर्मांची गणना करितों त्यांत स्नानसंध्या, पूजा, अर्चा, तीर्थयात्रा, दानधर्म, ईश्वरनामस्मरण, भजन व स्पर्शास्पर्शविधींचें पालन करणें, ह्या गोष्टी मुख्यत्वेंकरून येतात. पण ज्या मूळ हेतूनें ह्या धर्मकर्मांची योजना शास्त्रानें केली आहे तो मूळ हेतू—आपली व जगताची इहपारलौकिक उन्नत्ति होणें—ह्या कर्मांनीं आज आपणांवर साधतां येतो किंवा नाहीं, इकडे सहसा कोणीही लक्ष्य देत नाहीं. या बाबतींत केवळ अंधपरंपरेचें अनुकरण आमच्या हातून घडत असतां व आमच्या प्रपंचांत त्यामुळें पदोपदीं अडचणी येत असतां आह्मीं त्यांना धर्म ह्मणून कवटाळून बसलों आहोंत ! जर ह्या कर्मांपासून धर्माच्या मूळ उद्देशाला बाध येत नसेल—नव्हे, जर धर्माचा मूळ हेतु या कर्मांनीं आज साधतां येत नसेल तर हीं सर्व कर्में कोरड्या विहिरींत पोहरा टाकून पाणी काढण्याचा प्रयत्न करण्यासारखेंच व्यर्थ होय. अन्नाचें मूळ कार्य जी क्षुधाशांति तीच ज्या अन्नानें होत नसेल तर तें अन्न कसलें ? अमृत पिण्यानें जर मृत्यु येणें टळत नसेल तर तें खरें अमृत कोण ह्मणेल ? ज्याचें जें कार्य तें निश्चयानें घडून आलेंच पाहिजे. ह्याच न्यायानें धर्माचें कार्य जगद्रक्षण व प्राणीमात्रांचें इह-पारलौकिक कल्याण हें निश्चयपूर्वक घडून आलेंच पाहिजे. हें होत नसेल तर तो धर्म ठरणार नाहीं, हा अगदीं त्रिकालाबाधित सिद्धांत होय. आज आमची उपासमार टळण्यास, आमची गेलेली शक्ति पूर्ववत् आह्मांस प्राप्त होण्यास, आमचा कुचकाम झालेला मेंदू निर्दोष होण्यास जर ह्या साधनाची मदत होत नसेल तर तीं साधनें कदापिही धर्म्य ठरणार नाहींत.

यावरून स्नानसंध्यादि कर्में एकदम सोडून धर्मलंड बनावें, असा कांहीं कोणीही आपला समज करून घेऊं नये. सांगण्याचा मूळ हेतू हाच आहे कीं—ऋषींनीं धर्माच्या सदरांत त्रिकालाबाधित ह्मणून घालून दिलेल्या ह्या कर्मांनीं आज आमचा प्रपंच नीट होतो किंवा नाहीं व पारलौकिक सद्गतीचीं लक्षणें ह्यांनीं बरोबर जुळतात किंवा नाहीं हें प्रत्येकानें पाहिलें पाहिजे. व जर ही धर्माची प्रतिज्ञा बरोबर अनुभवास येत नसेल तर ती कां येत नाहीं ह्याचा विचार केला पाहिजे. लेखकाचें निश्चित मत आहे कीं परिस्थितिप्रमाणें ह्या धर्मकर्मांचा ओघ बदलविल्यास तीं निःसंशय आमच्या व जगाच्या कल्याणास सहाय्यक होतील. उदाहरणार्थ दानधर्माची दिशा गलेलठ्ठ व धडधाकट शरीराच्या टवाळखोर अशा, केवळ आडनांवानें ब्राह्मण ह्मणविणाऱ्या ग्रामभटाऐवजीं 'पैसाफंडा'सारख्या औद्योगिक संस्थांकडे वळेल तर धर्माचें हें कार्य सफल होऊं शकेल. दहापांच दगड घेऊन त्यांना ते

खातपीत नाहींत ह्मणून) धूप दीप नैवेद्य अर्पण करण्याऐवजीं जगांतील अथवा राष्ट्रांतील जिवंत भूदेवांना तीं अर्पण केल्यानें धर्माचें मूळ कार्य खचित् घडून येईल. यावरून बाकीच्याहि कर्मांची संगती लाऊन घ्यावी. कोणतेंही कर्म परिणामीं आपल्या, आपल्या राष्ट्राच्या व जगाच्या इहपारलौकिक उत्कर्षास कारण झालें पाहिजे. हा धर्माचा मूळ हेतू साधण्याची खबरदारी घेऊन कर्म केलें पाहिजे, तरच तें धर्म्य ठरेल !!!

कालिकिंकर.

---


# आमची तीर्थयात्रा.

—○:0:○—

अयोध्या मथुरा माया ।
काशी कांची अवंतिका ।
पुरी द्वारावती चैव ।
सप्तैते मोक्षदायकाः ॥ १ ॥

देवऋण व पितृऋण अंशतः फेडण्याकरितां व संसारताप शमन होण्याकरितां काशीयात्रेस जाण्याचें मी ठरविलें. आमचे समागमें आमचे बंधु चि० सखारामबापू यांनींही येण्याचा निश्चय केला. त्रिस्थळी ह्मणजे अलाहाबाद उर्फ प्रयाग, काशी व गया येथील यात्रा उरकून नंतर दहा वर्षांनीं एकदां येणारा हरिद्वारचा कुंभ मेळयाचा योग साधून पुढें श्री केदारनाथ व बद्रीनारायणाचे दर्शनास जाण्याचा आह्मी बेत केला. व गुरुपुष्ययोग पाहून सुमुहुर्तीं आह्मीं गुरुवार ता० २५ मार्च सन १९१५ रोजीं साताऱ्याहून निघालों तों बायकामाणसांसह सर्व यात्रा यथाशक्ती परिपूर्ण करून मनोदयाप्रमाणें परत साताऱ्यास गुरुवार ता० २७ मे सन १९१५ रोजीं ईश्वरकृपेनें सुखरूप येऊन पोहोंचलों. एवढ्या लांब पल्याची आमची यात्रा अगदीं अव्वलपासून अखेरपर्यंत

## श्रीविष्णु



—वरील मूर्ति श्रीक्षेत्रगया येथें घेतलेल्या प्रत्यक्ष फोटोवरून तयार केलेली आहे.

निर्विघ्नपणें पार पडली याबद्दल आह्मीं ईश्वराचे फार फार आभारी आहोंत. 'जन्मा आलीयाचें सार्थक' एकवार काशीयात्रा व श्री बद्रीनारायणाचें दर्शन घेऊन आमचे कित्येक भाविक मित्र करून घेतील अशी बळकट आशा असल्यामुळें व त्याकामीं आह्मास आलेल्या अनुभवाचा तादृश त्यांस उपयोग व्हावा या हेतूनें व ती माहिती आमचे परोपकारी मित्र श्रुतिबोधाचे प्रकाशक यांनीं आपखुषीनें आपल्या उषामालिकेंतून प्रसिद्ध करण्याचें कबूल केल्यावरून सहर्ष यात्रेसंबंधीं त्रोटक माहिती क्रमाक्रमानें आह्मीं देत आहोंत.

## अलाहाबाद ऊर्फ प्रयाग.

अलाहाबाद हें शहर दोन नद्यांचे संगमावर असल्यामुळें त्यास प्रयाग असें ह्मणतात. तें भागीरथी ऊर्फ गंगा व यमुना या दोन नद्यांचे संगमावर आहे. हें युनायटेड प्रॉव्हिन्सचें हेड क्वार्टर आहे. मुंबईपासून आगगाडी रस्त्यानें ८४४ मैल असून मेलचें थर्डक्लासचें भाडें रु. १२-४-० व इंटरक्लासचें भाडें रु. १८-१०-० आहे. फार लांबचा प्रवास केव्हांही मेलगाडीनें करणें इष्ट असल्यानें आह्मी कलकत्ता मेलनें गेलों. कलकत्ता मेलगाडीस ईस्ट इंडियन रेलवेचे इंटरचे डबे असतात ते ऐसपैस असतात. साताऱ्याहून जाणारास कल्याण जंक्शनवर उतरून मुंबईकडून जेव्हां कलकत्त्याची मेल येते तेव्हां तींत बसावें लागतें. त्याप्रमाणें आह्मीं कल्याणचे स्टेशनवर ता० २६ मार्च १९१९ रोजीं रात्रीं १० वाजतां अर्थात इंटरचे डब्यांत बसलों व दुसरे दिवशीं रात्रीं १२ वाजतां अलाहाबाद स्टेशनवर उतरलों.

वाटेंत इटार्सी जंक्शन व जबलपूर लागतें. इटार्सीला गाडी दोनप्रहरीं ११॥ वाजतां पोहोंचते व तेथें १२ मिनिटें थांबते. येथें फराळासाठीं मिठाई–पुरी वगैरे मिळते. त्याचप्रमाणें जबलपूरचे स्टेशनवरही पुरी भाजी वगैरे चांगली मिळते. वाटेनें सोंवळेंओंवळें करून भागत नाहीं. यात्रेंत मन सोंवळें असतें ह्मणून दोष मानीत नाहींत. जबलपूरास गाडी तिसरे प्रहरीं ४॥। वाजतां पोहोंचते. येथपर्यंत निम्यावेवर ह्मणजे मुंबईहुन ६१६ मैल प्रवास झालेला असतो. स्टेशनवर गाडीही बराच वेळ उभी राहते. पत्र वगैरे लिहिण्यास संधी मिळते. प्लॅटफॉर्मवरच फराळाचें दुकान असून भिंतीस एक गवाक्ष आहे त्यांतून तें दिसतें. त्यांतून दुकानदाराकडून सामान घेतां येतें. स्टेशन सोडून बाहेर जाण्याची जरुर पडत नाहीं व गाडी सोडून दूर जाण्याची छातीही पण होत नाहीं. जी. आय. पी. रेलवेचे पेक्लार्क्स मुंबईहून पगार वाटण्यासाठीं येथपर्यंत येतात. त्यांच्या वाटेनें ओळखी असतात व त्यांपैकीं एखाद्याचे ओळखिनें अगाऊ पत्र पाठवून तजवीज केली असतां हर्डा वगैरे स्टेशनवर ताजें अन्नही मिळूं शकतें. कलकत्ता मेल थेट अलाहाबाद स्टेशनवर जात नाहीं. दरम्यान चौकी ह्मणून स्टेशन आहे तेथें उतरावें लागतें व तेथून दुसरी ट्रॅनशिप गाडी लागलीच निघते, तींतून जावें लागतें.

सुमारें अर्ध्यातासांत अलाहाबाद स्टेशनास जाऊन पोहोंचते.

अलाहाबाद गावांतून दोन तीन रेल्वेचे फांटे गेलेले आहेत. अलाहाबादेचा दारागंज ह्मणून एक भाग आहे तो गंगानदीस लागून आहे. या ठिकाणीं यात्रेकरुंनीं उतरणें सोईचें आहे. दारागंज स्टेशनपासून सुमारें तीन चार मैल लांब आहे. गाड्या व टांगे मिळतात. येथील टांगे चमत्कारिक असतात. एका लांकडाचे तक्त्यावर चार काठ्या उभ्या केलेल्या असतात. त्या डोकीवर जवळ जवळ आणलेल्या असतात व त्यावर अच्छादन घातलेलें असतें. या लांकडाचे तक्त्यावर बैठक घातलेली असते त्यावर एकास एक लागून २।३ माणसें दाटीनें बसतात व खालीं पडूं नये ह्मणून बाजूच्या काठ्यास धरितात. घोडें लहान व बहुतकरून घाणेरडेंच असतें. अशाच तऱ्हेचे टांगे काशी—गया—हरिद्वार वगैरे उत्तरेकडील सर्व प्रदेशांत पाहण्यांत आले. इकडे गोषाचा फार प्रघात असल्यामुळें शिग्राम गाड्या पुष्कळ आहेत.

जबलपुरापासून पुढें दक्षिणी भाषा बोलणारा क्वचित् भेटतो. ज्यांच्याशीं संबंध येतो ते सर्व हिंदीभाषा बोलणारे असतात. हिंदीभाषेची फार जरूरी असते.

गंगापुत्रास पंडे ह्मणतात. गंगापूजन व वेणीदानाचा हक्क यांचा आहे. यात्रेकरूस अडवून त्याजकडून पैसे घेऊन हे फार श्रीमंत झालेले आहेत. न अाडविणारा पंडा भेटला ह्मणजे नशीब समजावें. यात्रेकरी भाविक असतो व पंड्यानें संतुष्ट होऊन आपणास यात्रा सुफल होवो असा अशिर्वाद द्यावा यांकडे त्याचें लक्ष असते त्याचा ते फायदा घेतात. पंड्याचे गुमास्ते स्टेशनवर पुष्कळ आलेले असतात. यात्रेकरू आधींच प्रवासानें दमलेला असतो त्यास प्रत्येकजण तुह्मी कुठले, गांव कोण-बाप कोण वगैरे प्रश्न करून फार त्रास देतात. असाच प्रकार सर्व क्षेत्राचे ठिकाणी होतो. आमचे वंशांतील जे कोणी यात्रेस येतील ते तुमचे पूजन करतील असा लेख पंडे लिहून घेत असतात. तेव्हां अशा आपल्या पंड्याचें नांव आपणांस सांगतां आलें तर मात्र पुष्कळ त्रास चुकतो. एवढ्याकारितां शक्य तर अगाऊ पंड्याचें नांव योजून ठेवावें व ते सांगितलें ह्मणजे मग हें गुमास्ते त्रास देत नाहीत. बरेचसे पंडे अमंगळ व अक्षर शत्रू आहेत. याची जागा उपटण्याचा दाक्षिणी ब्राह्मणांनीं प्रयत्न चालविला आहे. त्यांचे पूजन केले ह्मणजे एकतर भाषेची पहिली अडचण दूर होते व दुसरें त्यांना नवीन महत्व प्राप्त करून घेण्याचे असल्यामुळें ते यात्रेकरूच्या मर्जी माफक चालतात व मोठे आर्जवी असून त्यांचे सुख दुःखाकडे लक्ष पुरवितात. एतदर्थ आह्मी वे. रा. गोपाळभट मराठे उर्फ लक्कड यांजकडे उतरलो. ते दारागंजांत राहतात. तेथे ते महशूर आहेत. यांनीं आमची सोय चांगली लावली. आमचे वडिलांनीं रामरतन मातादिन अंजन पांडे यांचे पूजन केले होते तेव्हां त्यांस बोलाऊन आणून त्यांचे

द्वारा गंगाभेट वेणिदान वगैरे करवून त्यांची-ही योग्य संभावना केली.

प्रयागला पोहोंचल्यावर एक दिवस थांबून नंतर ता. २९।३।१९ पासून यात्रेसंबंधीं कृत्यें करण्यास सुरवात केली व तीन चार दिवसांत सर्व विधी यथास्थित रितीनें पार पडलें.

दारागंज गंगा व यमुनेच्या चिमट्यांत आहे. अलाहाबादेस मोठा भुईकोट लढाऊ किल्ला आहे त्याचें बाजूनें यमुनानदी वहात येते. किल्ल्याचे खालून सरस्वती येते. गंगेचे पाणी शुभ्र, यमुनेचें काळें व सरस्वतीचें लाल वर्णा वर आहे. हे निरनिराळे रंग संगमावर दिसतात. सरस्वतीचा प्रवाह यमुनेचे प्रवाहांत सामील झालेला आहे यामुळें निराळा कोठेंच तो दिसत नाहीं. संगमाची जागा किल्ल्यापासून सुमारे एक मैलावर आहे. तेथे जाण्यास किल्ल्यापाशीं लॉंच बोटी अथवा होड्या भाड्यानें मिळतात. जाता येतां माणसी आणा दोन आण्यास होडी भाड्यानें मिळते. होडींतून जातांना फार मौज वाटते. संगमावर बसण्याकरितां पंडे लोकानीं फळ्याचे तरते घाट केले आहेत त्यांवर बसतात. या ठिकाणीं पंडे लोक गंगाभेट करवितात. व येथेंच क्षौर विधी होतो. या दिवशीं उपवास करावा लागतो. गंगा भेटीचा प्रकार असा कीं पंडे हातात नारळ देऊन तोंडानें मंत्र ह्मणून तो नारळ गंगेत सोडवितात व तो लगेच आपण घेतात गंगेचें पाणी हलकें व तेजोमय असल्यानें स्नान केल्याबरोबर एक प्रकारचा आनंद वाटतो. त्याचें वर्णन करतां येत नाहीं. संगमाजवळच वाळवंटात पंडे लोकांनीं आपले चिन्हांचे ध्वज लाविलेले आहेत.

तिन्ही नद्यांची वेणी झालेली आहे सबब याच ठिकाणीं वेणीदान करतात. वेणी दानाचा मोठा समारंभ असतो. पांढरी शूभ्र वस्त्रें परिधान करून मळवट भरून गळ्यांत माळा घालून वाजत गाजत संगमावर जातात. व तेथें आपल्या हस्ते भार्येची वेणी घालून तिचा तीन बोटा येवढा शेंडा कातरून गंगेस अर्पण करतात. हा विधी उरकला ह्मणजे स्त्रिया आपल्या जन्माचें साफल्य झालें असें मानतात. पंडे लोकांची अडविण्याची हीच वेळ असते. आह्मी इतकें देऊं त्यांत तुह्मी संतुष्ट राहावें असा अगाऊच करार करून ठेवला असावा ह्मणजे बरें.

किल्याचे भुयारांत अक्षयवटाचा बुंधा आहे. भुयारांत उजेडाची अलीकडे तजवीज केलेली आहे. याच भुयारांत चांगल्या चांगल्या पाषाणाच्या घडीव मूर्ती आहेत. किल्याचे दुसरे भागांत कोठेही जाण्याची बंदी आहे.

पंडेलोक दक्षिणी लोकांकडे भोजनास आले ह्मणजे फक्त पक्की रसोई खातात. साधारण कोणत्याहि रसयुक्त पक्वानास तिकडे रसोई ह्मणतात. भात वगैरे ते खात नाहींत.

दही दूध वगैरे पदार्थ मातीच्या लोटक्यातून विकत मिळतात या मातीच्या लोटक्यास अगदीं अल्प किंमत पडते. एकदां उपयोगांत आणलेलें हें भांडें पुन्हां उपयोगात आणीत

नाहींत. या भांड्यास एक प्रकारचा वास येतो. तो प्रथम प्रथम सहन होत नाहीं. गंगेच्या काठची वाळू पांढरी शूभ्र पिठासारखी असते. ती वाऱ्यानें चहूंकडे उडते. पिठामध्येंही रेती असते. पाण्यामध्येंही रेती असते. यामुळें पदार्थांची रुची कमी वाटते.


प्रयागेंतील दर्शनीय स्थानें खालील श्लोकांत गोंवलीं आहेत:—

**त्रिवेणीं माधवं सोमं ॥**
**भारद्वजं च वासुकीं ॥**
**वंदे अक्षय वटं चैव ॥**
**प्रयागे तीर्थ नायकम् ॥**

दारागंजापासून अगदीं नजीक इजतब्रिज. ह्मणून औध रोहिलखंड रेल्वेचें स्टेशन आहे तेथें ता. १।४।१९ रोजीं पहाटे एक वाजतां गाडींत बसून सकाळीं श्रीक्षेत्रकाशी येथें जाऊन पोहोचलों. थर्डक्लासचें भाडें एक रुपया पडतें. या मध्येंच यात्रेकऱ्यांपासून एक आणाकर कापून घेतलेला असतो.

प्रयागहून निघण्यापूर्वी तेथें आह्मांस श्री बद्रीनारायणाचा पंड्या रा. दौलतराम घनश्याम यांचा गुमस्ता वासुदेव ह्मणून भेटला. व त्यानें बद्रीनारायणाचे पट ह्मणजे दरवाजे चालूसालीं केव्हां खोलणार याबद्दल माहिती आणविण्याचें कबूल केलें.

येथपर्यंत आमच्या यात्रेपैकीं एक प्रमुख स्थळाचे वर्णन झालें येथून पुढें आमच्या खऱ्या काशी यात्रेस प्रारंभ झाला. तेथील आमच्या अनुभवाची मनोरंजक हकीकत पुढील खेपेस देण्याचें योजिलें आहे.—



# सुवर्ण महाल

( लेखकः—विश्वविहारी. )

असंभवनीय! असंभवनीय!! अशक्य! अशक्य!! निव्वळ काल्पनीक! ओहो? कोण हा भडिमार, काय हा गहजब. वाः कहो? थांबा, कोण हा तुमचा उतावीळपणा, ह्या गोष्टीच्या सत्यतेविषयीं हवा कशाला संशय? ही गोष्ट खरी घडली आहे अशी मी तुह्मांला ग्वाही देतो. अहाहा, तो अद्भुत, तो सुंदर देखावा मी आजन्म विसरणार नाहीं. मी प्रत्यक्ष स्वप्नांत सुद्धां नव्हे—पाहिलेली गोष्ट आहे. त्यावेळीं मी प्रत्यक्ष जरी ती गोष्ट पाहिली तरी कांहीं-वेळ माझा मलाच तिजविषयीं संशय येऊं लागला, माझा आत्मा दुसऱ्या एखाद्या लोकीं संचार करीत असतां त्या लोकांतली तर मी ती अद्भुत गोष्ट पाहिली नसेलना? असेंहि मला वाटलें, ह्या गोष्टीच्या सत्यतेविषयीं मी आमच्या वृद्धभट्याला सुद्धां खोदखोदून विचारलें. त्यानें सर्व गोष्टी खऱ्या असल्याचें सांगितलें इतकेंच नव्हे तर आणखीही कांहीं गोष्टींचा त्यानें मला खुलासा करून दिला, आतां तरी या गोष्टीवर विश्वास—अरे पण हो—अगोदर गोष्ट तर ऐका, आणि मग वाटला तर विश्वास ठेवा. नाहीं तर? तुमची मर्जी?

कोणच्या सालांतली बरें ती गोष्ट? पण सालाशीं आपल्याला काय करावयाचें आहे! कालाचा माझ्या गोष्टीवर खास कांहीं परिणाम होणार नाहीं, किंवा त्या गोष्टीच्या गूढावरही कांहीं प्रकाश पडणार नाहीं. पण ती गोष्ट २० व्या शतकांतली मात्र खरी. कलकत्त्याच्या "नॅशनल मेडिकल कॉलेज" मध्यें मी नुक्ताच प्रवेश केला होता. डॉ. सतीशचंद्र बाबूंची व माझी मी मुंबईस असतांनाच कांहीं कारणामुळें ओळख झाली होती. त्यामुळें कलकत्त्यास आल्यावर मी त्यांचेच घरीं उतरलों, पुढें त्यांच्याच सांगण्यावरून मी कायमचाच त्यांच्या घरीं राहूं लागलों. त्यांच्या पुस्तकालयाचा, व रसायन

शाळेचा मला उपयोग करण्यास पूर्ण मुभा असल्यामुळें मला त्यांच्या येथें रहाण्यांत बराच फायदा होता. शिवाय गृहस्थिती बरीच असमाधानकारक असल्यामुळें स्वतंत्र जागेचें जब्बर भाडें देणें मला फारच जड गेलें असतें, सबब ही सोय उत्तमच झाली असें मला वाटूं लागलें.

पण दुर्दैवानें ही सोय फार दिवस टिकण्याचें चिन्ह दिसेना. काय असेल तें असो, निसर्गतःच स्त्रियांचा स्वभाव हेवेखोर, हेमलताबाईंस आमचें फुकट राहणें खपेना. डॉ. सतीशचंद्रांची "प्रॅक्टीस" कांहीं वाईट नव्हती, माझ्या नऊ—दहा रुपयांची त्यांना मदत होईल असेंहि मुळींच नव्हतें, किंवा माझी त्यांना गैरसोय होत होती अशांतलाही कांहीं भाग नव्हता पण हेमलताबाईंनीं मजजवळ भाड्याबद्दल गोष्ट काढलीच. बरें, भाडें मागितलें तेंहि कांहीं थोडें नाहीं, तितकें भाडें देणें माझ्या अगदीं आंवाक्याबाहेरचें होतें. या बाबतींत सतीशचंद्र बाबूंना व हेमलताबाईंचा थोडा खटकाहि उडाला पण शेवटीं सर्व साधारण नियमाप्रमाणें हेमलताबाईंचाच विजय झाला. प्रेमाचा "विश्वप्रेम" ह्मणून कांहीं पवित्र प्रकार आहे ह्याची स्त्रियांस ओळखच नसते, पतीनें आपल्या पत्नीस पाहिजेतर प्रेमळ ह्मणावें, पण स्त्रीस 'प्रेमळ' ठरविणें ह्मणजे प्रेमाची विटंबना करणें होय असें कित्येक स्त्रिया आपल्या वर्तनानें सिद्ध करून देत आहेत.

सायंकाळची वेळ, कांहीं वेळ विश्रांती घेण्यासाठीं मी हातांतलें पुस्तक खालीं ठेवलें, माझें मन आज स्वस्थ नव्हतेंच, पण इतका वेळ अभ्यासाकडे माझें लक्ष असल्यामुळें पुढील संकटाचा विचार—हा वेळपर्यंत माझ्या मनांत आला नाहीं, "आला नाहीं" ह्मणण्यापेक्षां "मी येऊं दिला नाहीं" ह्मणणें जास्त शोभेल." पुस्तक खालीं ठेवल्याबरोबर "पुढें काय करावें" "जागा कोठें पहावी" वगैरे प्रश्न माझ्या मनाची अस्वस्थता वाढवूं लागले. भाडें जास्त देणें माझ्या स्थितीस केव्हांहि शक्य नव्हतेंच. महिन्याचा इतर खर्चच मला मोठ्या शिकस्तीनेंच भागवावा लागत असे. थोड्या खर्चात जागा कोठें मिळेल? हा विचार करीत मी इकडे तिकडे हिंडत होतों. अभ्यासानें आधींच माझे मस्तकांत गोंधळ उडवून दिला होता. त्यांत परिक्षेच्या अगदीं ऐनवेळींही भलतीच अडचण उपस्थित झालेली, त्यानें तर मी आज फारच अस्वस्थ झालों होतों. जागा कोठें मिळणार? आणि भाडें तरी कोठून भरावयाचें? स्वतंत्र खोली नऊ दहा रुपयांच्या खालीं तर मिळणें शक्य नाहीं—व इतकें भाडें देऊन मग पोटाची व्यवस्था काय करावयाची?

( अपूर्ण )